**नियमित दिवाणी दावा क्र. ६/२०१७ मधील निशाणी क्र. ८५ वरील आदेश**

**आदेश पारित दिनांक १९/०३/२०२५**

वादीतर्फे प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २/४ सुरेखा सिध्दगौंडा बोऱ्याळ यांना दाव्याचे समन्स काढले असता निशाणी ८४ कडील रिपोर्टनुसार ''सदर नोटीशीत नमूद व्यक्तीचे पत्यावर जावून स्थानीक चौकशी केली असता सदर व्यक्तीचे घरास कुलुप असलेने समन्स न बजावता परत'' अशा शेऱ्यानीशी न बजावता परत आले आहे. तरी सदर प्रतिवादी विरुद्ध फेर समन्सचे आदेश होवून सदर समन्सची प्रत डकवून बजावणी बाबत आदेश होण्यासाठी दाखल केलेला आहे.

२) अर्ज वाचला. अर्जासोबतच्या प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले. वादी तर्फे विध्दवान विधिज्ञ श्री. करजगार याचा युक्तिवाद ऐकला.

३) अर्जातील कथनाच्या अनुशंघाने प्रकरण संचिकेचे अवलोकन केले. सदरचा दावा प्रतिवादी क्र. २/४ वर समन्सची बजावणी करण्याकरिता मागील ५ वर्षापासून प्रलंबित आहे. वादीने वेळोवेळी दावा समन्सची बजावणी प्रतिवादी क्र. २/४ वर करण्याचा प्रयत्न वारंवार केले असल्याचे दिसून येते. बेलिफ रिपोर्ट वरुन प्रतिवादी क्र.२/४ यांनी दिलेल्या पत्त्यांवरील घराचे कुलुप लॉक असल्याबद्दलचा अहवाल जिल्हा न्यायालय विजापूर, कर्नाटक यांचे पत्र क्र. No. CPN/ 14984/2024 दिनांक १७/१२/२०२४ अन्वये प्राप्त झाले आहे. मा. जिल्हा न्यायालय विजापूर याच्या पत्रासोबत प्रतिवादी क्र. २/४ चा दावा समन्स निशाणी ८४ चे अवलोकन केले असता दिलेल्या पत्त्यांवर घराला कुलुप असल्याने बजावणी करता आली नाही असा शेरा कन्नड भाषेत शिरस्तेदार मा. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर विजापूर यांनी दिलेला असल्याचे निदर्शनास येते. प्रतिवादी क्र. २/४ ही दिलेल्या पत्त्यांवर निश्चीत केव्हा मिळून येईल जेणेकरुन तिच्यावर दावा समन्सची बजावणी करता येईल याबद्दल निश्चिंतता नाही. अशा परिस्थितीत दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ५ नियम १७ चे अवलोकन करणे गरजेचे आहे.

4) As per Order 5 Rule 17 of CPC, where the

serving officer after using all due and reasonable diligence, can not find the defendant, who is absent from his resident at the time when service is sought to be effected on him at his residence and there is no likelihood of his being found at the residence within a reasonable time, the serving officer shall affix of copy of the summons on the outer door or some other conspicuos part of the house in which the defendant ordinarily reside.

५) प्रकरण संचीकेचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. २/४ च्या पत्त्यांवर समन्सची बजावणी करण्याकरिता सर्विंग ऑफिसर गेले असता त्यांना प्रतिवादी क्र. २/४ च्या घराच्या दाराला कुलुप लावल्याचे आढळले. मा. जिल्हा न्यायालय विजापूर यांच्या कडून प्राप्त अहवाल व समन्स वरुन हे स्पष्ट होते. परंतु प्रतिवादी क्र. २/४ च्या समन्समध्ये दिलेला पत्ता चुकीचा किंवा त्या पत्तयांवर प्रतिवादी क्र. २/४ राहत नसल्या संबंधाने समन्स बजावणी करणाऱ्या अधिकारी यांनी काहीच भाष्य केलेले नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. २/४ च्या समन्स मध्ये नमूद पत्ता बरोबर असल्याचे निदर्शनास येते. प्रतिवादी क्र. २/४ निश्चित कोणत्या वेळेस घरी राहतात या बद्दल माहिती नसल्याने प्रतिवादी क्र. २/४ ला समन्सची बजावणी होवू शकली नाही.

६) अशा परिस्थितीत दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ५ नियम १७ अन्वये प्रतिवादी क्र. २/४ वर दावा समन्सची बजावणी डकवून केल्याशिवाय दावा समन्सची बजावणी प्रतिवादी क्र. २/४ होणे शक्य नाही. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र. २/४ यांना दावा समन्सची बजावणी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ५ नियम १७ अन्वये दावा समन्सची

बजावणी करण्यात यावी.

२. प्रतिवादी क्र. २/४ सुरेखा सिध्दगौंडा बोऱ्याळ रा. महादेव देवळाजवळ, इ.डी रोड सात नं. चाळीजवळ, शहापेटी गल्ली, ता. विजापूर जि. कर्नाटक यांच्या आखेरच्या निवास स्थानचा दर्शनी भागातील दरवाजावर दावा समन्सची डकवून बजावणी करावी व त्याचा सविस्तर अहवाल या न्यायालयात पाठविण्यात यावा.

PRAKASH CHUNNI BACHHALE

Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2025.03.19 17:31:28 +0530

स्थळ : जत (प्रकाश सी. बछले)

दिनांक : १९/०३/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, जत